# महानगरपालिका

## १. सीआर/३७/मुंबई/१४

दि. ११.१.२०१४ रोजी आरोपी लोकसेवक प्रकाश अनिल शिंदे, दुय्यम अभियंता, वर्ग–२, इमारत कारखाने, अे वॉर्ड, महानगरपालिका, शहीद भगत सिंग मार्ग फोर्ट, मुंबई यांनी फिर्यादी यांचे कुलाबा येथील राहत्या प्लॅटचे नूतनीकरण करण्यासाठी ई वॉर्डला नकारात्मक अहवाल न पाठविता नूतनीकरणास परवानगी देण्याकरीता रोख रक्कम रु.७०,०००/– लाचेची मागणी करुन चर्चेअंती रु. ६०,०००/– लाच स्वीकारली.

सदरबाबत मुंबई विभाग, अॅन्टी करप्शन ब्युरो ०२/२०१४ कलम ७, १३ (१) (ड) सह १३ (२) लाप्रका १९८८ अन्वये नोंद करण्यात येवून आरोपी लोकसेवक यांना अटक करण्यात आली आहे.

## २. सीआर/२०८/अहमदनगर/१४

फिर्यादी यांची केडगांव, अहमदनगर शिवारात सर्व्हेनंबर ३२७/२ मधील २ हेक्टर ३६ आर इतके क्षेत्र खरेदी केलेले आहे. सदर क्षेत्राची ट्रान्सफर ऑफ डेव्हपमेंट राईटसची परवानगी मिळणेकरीता सुमारे चार महिन्यापूर्वी फिर्यादी यांनी महानगरपालिका, अहमदनगर येथे प्रकरण दाखल केले होते.. फिर्यादी यांनी दाखल केलेल्या प्रकरणाप्रमाणे सदर क्षेत्राचे ट्रान्सफर ऑफ डेव्हपमेंट राईटसची परवानगी देणेकरीता आरोपी लोकसेवक विश्वनाथ भागोजी दहे, नगररचनाकार, वर्ग–१, महानगरपालिका, अहमदनगर यांनी तक्रारदार यांचेकडे रु. १८,००,०००/– लाचेची मागणी करुन तडजोडीअंती दिनांक १४/०३/२०१४ रोजी पंचसाक्षीदारासमक्ष रु. ४,००,०००/– ची लाच स्वीकारली असता त्यांना पकडण्यांत आले.

सदरबाबत तोफखाना पोलीस ठाणे अहमदनगर गुरनं. ३०४०/२०१४ कलम ७, १३ (१)(ड) सह १३(२) लाप्रका १९८८ अन्वये नोंद करण्यात येवून आरोपी लोकसेवक यांना अटक करण्यात आली आहे.

## ३. सीआर/५१२/ठाणे/१४

फिर्यादी यांचा ऑक्ट्राय एजन्सीचा व्यवसाय असून ऑक्ट्राय एजंट म्हणून काम करतात. मुंबई येणाऱ्या निर्यातदार व्यापाऱ्यांच्या मालावरील जकात भरणाचे कामकाज करतात. दिनांक २९/०५/२०१४ रोजी फिर्यादीचे अशील असलेल्या कंपनीचे ७ टेम्पो वाशी येथील जकात नाक्यावर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी जकात न भरण्याच्या कारणावरुन अडवून ठेवले. दिनांक ०४/०६/२०१४ रोजी फिर्यादी यांनी आरोपी लोकसेवक सुनिल बळीराम बने, उपकर निर्धारक व संकलक, कांजूरमार्ग विभाग, व्हिजीलन्स ाखा, बृहन्मुंबई महानगरपालिका यांची भेट घेतली. आरोपी सुनिल बळीराम बने यांनी पकडलेल्या ७ टेम्पोसाठी रु. ३० लाख दंड भरावा लागेल असे फिर्यादीस सांगीतले. तडजोडीअंती रु. ३० लाख दंडाच्या १०टक्के म्हणजेच रु. ३ लाख लाचेची मागणी आलोसे बने यांनी केली. त्या दरम्यान फिर्यादी यांनी महानगरपालिका कार्यालयाशी संपर्क साधून दंडाची रक्कम भरुन सदर टेम्पो सोडवून घेतले.

दिनांक ०९/०६/१४ रोजी फिर्यादी यांच्या अशीलाची गाडी आरोपी बने यांच्या सांगण्यावरुन अडवली असल्याबाबत व्हिजीलन्स डिपार्टमेंटचे श्री बोराडे यांनी सांगीतले. त्या संदर्भात फिर्यादी यांनी आरोपी बने यांची भेट घेतली असता मागील व्यवहारात ठरलेले रु. ३ लाख लाचेची मागणी फिर्यादी यांच्याकडे केली. फिर्यादी यांनी त्याबाबत ॲन्टी करन्शन ब्युरो या ठिकाणी तक्रार नोंदवली. दिनांक १६/०६/१४ रोजी पडताळणी केली असता आरोपी बने यांनी रु. ३ लाख लाचेची मागणी करुन स्वीकारण्याचे मान्य केले. दिनांक १७/०६/१४ रोजी आरोपी लोकसेवक सुनिल बळीराम बने, उपकर निर्धारक व संकलक, कांजूरमार्ग विभाग, व्हिजीलन्स ाखा, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना रु. ३ लाखाची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले.

सदरबाबत राबोडी पोलीस ठाणे, जिल्हा ठाणे गु.र.नं. २९/२०१४, ला.प्र.का. सन १९८८ चे कलम ७, १३(१) (ड) सह १३(२) लाप्रका १९८८ अन्वये नोंद करण्यात येवून आरोपी लोकसेवक यांना अटक करण्यात आली आहे. अटक आरोपी लोकसेवक सुनिल बळीराम बने, उपकर निर्धारक व संकलक, कांजूरमार्ग विभाग, व्हिजीलन्स ाखा, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे घरझाडतीमध्ये रोख रक्कम रु. ८,००,०००/— व रु.१३,९४,०००/— फिक्स डीपॉझीट/एलआयसी/इतर, सोने व स्थावर अशी बेहीशोबी मालमत्ता मिळून आली.

४. सीआर/१३०/मुंबई/२०१५

फिर्यादी सतीश लालबहुदर गुप्ता, हे रुम क्र ४, शंभुशेठ चाळ, गजधर बांध रोड, सांताक्रुज (प), मुंबई या ठिकाणी राहण्यास असुन सुमारे १६ ते १७ व ापासुन सांताक्रुझ रेल्वे स्टेशन जवळ, शबरी हॉटेल समोर, टिळक रोड, सांताक्रुझ पश्चिम, मुंबई या ठिकाणी पाणी पुरी व भेळपुरी विक्रीचा फेरीचा धंदा करतात.

दिनांक ५/२/२०१५ रोजी आरोपी लोकसेवक सचिन संखे अनुज्ञापन निरीक्षक,अनुज्ञापन खाते, एच पश्चिम विभाग, महानगरपालीका, बांद्रा, मुंबई हे फिर्यादी यांच्या हातगाडीजवळ आले व त्यांनी फिर्यादी यांना काम बंद करण्याची लेखी नोटीस दिली व पुढे सांगीतले की 'तु कलसे यहा पे धंदा करना नाही, अगर तुझे धंदा करना है तो मेरे ऑफीस बांद्रा मे आके मिलो' त्यावर फिर्यादी यांनी दिनांक ६/२/२०१५ रोजी आरोपी लोकसेवक सचिन संखे यांना मोबाईलद्वारे संपक्र करुन बृहन्मुंबई महानगरपालीकेचे एच/डब्ल्यु वॉर्ड बांद्रा, मुंबई येथे जावुन समक्ष भेट घेतली असता आरोपी यांनी फिर्यादींना सांगितले की, 'अगर धंदा चालु रखना है तो मुझे पीछले साल का पुरा पैसे पकडकर एक लाख रुपया देना होगा' फिर्यादी यांनी आरोपी लोकसेवक सचिन संखे यांना पैसे कमी करण्याची विनंती केली असता त्यांनी पन्नास हजार रुपयांची मागणी केली.

त्यानंतर आरोपी लोकसेवक सचिन संखे यांचेविरुध्द एसीबी गु. र.क्र. ०९/१५, कलम ७ ला.प्र.का. १९८८ अन्वये दि. १०/०२/२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

दिनांक १०/०२/२०१५ रोजी बृहन्मुंबई महानगरपालीकेचे एच/डब्ल्यु वॉर्ड बांद्रा, मुंबई या ठिकाणी सापळा कारवाईचे आयोजन करण्यात आले असता सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक सचिन संखे यांनी फिर्यादीकडे रु.४०,०००/—लाचेची मागणी करुन सदरची लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर आरोपी लोकसेवक सचिन गजानन संखे, अनुज्ञापन निरिक्षक, एच पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यास रंगेहात पकडले.

आरोपी सचिन संखे यांच्या घरी घेण्यात आलेल्या घरझडतीमध्ये रु.१,७०,०००/— रोख व जवळपास चार चाकी वाहने, एक मोटार सायकल तसेच काही फ्लॅट खरेदी केल्याची व इतर कागदपत्रे प्राप्त झाली असल्याने आरोपीविरुध्द ॲन्टी करप्शन ब्युरो, मुंबई विभागामार्फत उघड चौकशी क्रमांक ०१/२०१५ अन्वये सुरु करण्यात आली आहे.

## ५. सीआर/१०१/कोल्हापूर/२०१५
## कोल्हापूर (महापौर)

तक्रारदार यांचे सि.स.न.१५४४/ब मधील वडीलार्जीत मालमत्तेपैकी १६.७ चौ.मी. जागा कोल्हापूर महानगरपालीकेने विनामोबदला संडास पॅसेज म्हणून अॅक्वायर्ड करुन घेतली आहे. सदर जागा पुन्हा नावावर करुन मिळणे बाबत तक्रारदार यांचे वडीलांनी दि. १५/१/२०१४ रोजी आयुक्त,कोल्हापूर महानगर पालीका, इस्टेट विभाग,कोल्हापूर यांचे नांवे अर्ज दिला आहे. सदर अर्जानुसार महानगरपालीकेच्या संबधीत विभागाकडून अभिप्राय होवून तक्रारदार यांचे वडीलांनी अर्जात नमूद केलेली जागा पुन्हा त्यांचे ताब्यात देणेबाबत सर्वसाधारण सभेमध्ये ठराव मंजूर झालेला आहे. त्यानंतर सदर कामाचे फायनल ऑर्डरवर महापौर श्रीमती तृप्ती माळवी यांनी सही करणेसाठी यांनी त्यांचे खाजगी स्विय सहायक अश्वीन गडकरी यांचेमार्फत तक्रारदार यांचेकडे रु.४०,०००/— लाचेची मागणी केली. सदरबाबत तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर येथे तक्रार दिली आहे. सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ३०/०१/२०१५ रोजी कोल्हापूर महानगरपालीका, कोल्हापूर येथे सापळा आयोजीत केला असता, तक्रारदार श्री.पाटील यांचेकडून महापौर तृप्ती माळवी यांचेवतीने त्यांचे खाजगी स्विय सहायक अश्विन गडकरी यांनी कोल्हापूर महानगरपालीका, कोल्हापूर येथे रु. १६,०००/— लाच रक्कम स्विकारली असता, त्यांना रंगेहात पकडले आहे.

सदर बाबत अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे, कोल्हापूर भाग ६ गु.र.नं. १०/२०१५ लाच लुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७, ८, १२, १३(१)(ड) सह १३(२) अन्वये गुन्हा नोंद करून यातील दोन्ही आरोपींना अटक करणेत आली आहे.